## -: प्रेसनोट दिनांक - २५/०९/२०२५ :-

**आरोपी विनायक सुरेश तेजम, वय - ३७ वर्षे, खाजगी वकील, रा. फ्लॅट नं.ए-९, मंजुळा अपार्टमेंट, के.डी.सी.सी. बँक समोर शाहुपूरी कोल्हापूर, जि.कोल्हापूर याने प्रांत कार्यालय करवीर यांचेकडुन त्याचे ओळखीने काम करून घेतले असुन त्याकरीता प्रांत कार्यालयात पैसे दयावे लागतील असे म्हणुन लाच मागणी करून स्विकारलेबाबत........**

---

यातील मुळ तक्रारदार यांचे कोल्हापूर येथील मिळकती वरील ब सत्ता प्रकार कमी करणेसाठीचे प्रकरण प्रांत कार्यालय करवीर येथे दाखल होते. त्या प्रकरणावर प्रांत कार्यालय करवीर येथुन आदेश काढुन देणेसाठी खाजगी वकील विनायक तेजम याने प्रांत कार्यालयात देणेसाठी तक्रारदार यांचेकडुन तक्रारीपुर्वी १,६५,०००/-रूपये घेतले होते. त्यानंतर तक्रारदार यांचे प्रकरणाचा मुळ आदेश काढुन देणेकरीता प्रांत कार्यालयात आणखीन १,००,०००/- रूपये द्यावे लागतील असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे २५,०००/- रूपये लाचेची मागणी केली होती. त्यानंतर तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे तक्रार दिलेली होती.

तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये मुळ तक्रारदार यांचे कोल्हापूर येथील मिळकती वरील ब सत्ता प्रकार कमी करणेसाठीचे प्रकरणावर प्रांत कार्यालय करवीर येथुन आदेश काढुन देणेसाठी खाजगी वकील विनायक तेजम याने प्रांत कार्यालयात देणेसाठी तक्रारदार यांचेकडुन यापुर्वी १,६५,०००/- रूपये घेतल्याबाबत दुजोरा देवुन तक्रारदार यांच्याकडे त्यांचे मिळकतीचे प्रकरणाचा आदेश प्रांत कार्यालय करवीर यांचेकडुन प्राप्त करून घेतला आहे म्हणुन प्रांताधिकारी करवीर यांचे नाव सांगुन त्यांचेकरीता आणखीन २५,०००/- रूपये दयावे लागतील असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे २५,०००/- रूपये लाचेची मागणी केलेचे निष्पन्न झाले.

सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष विनायक तेजम यांनी तक्रारदार यांचेकडुन मागणी केलेप्रमाणे २५,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारलेने त्यांना पकडणेत आले. सदरबाबत आरोपी विनायक सुरेश तेजम, वय - ३७ वर्षे, खाजगी वकील, रा. फ्लॅट नं.ए-९, मंजुळा अपार्टमेंट, के.डी.सी.सी.बँक समोर शाहुपूरी कोल्हापूर, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द शाहुपूरी पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. अर्जुन भोसले, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे तसेच वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक यांचे मार्गदर्शनानुसार राजेंद्र सानप पोलीस निरीक्षक, पो.हे.कॉ. सुधीर पाटील, पो.ना. सचिन पाटील, पो. कॉ. संदिप पवार, पो.कॉ. कृष्णा पाटील, चा.पो.कॉ. प्रशांत दावणे ला.प्र.वि.कोल्हापूर अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४,
०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्रीमती वैष्णवी सुरेश पाटील,पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर
मो.नं. ९७६४१४०७७७. ९४०४३२१०६४ कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४. ५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.

Scanned with OKEN Scanner